# "मनुष्य जीवनाचा सार म्हणजे भगवत गीता"

स्वातंत्र दिनाच्या पार्श्वभुमीवर गुरुवार दि. १५ ऑगष्ट रोजी सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयात भारतीय स्वतंत्र दिन मोठया उत्साहाने साजरा करण्यात आला. स्वातंत्र दिनाच्या अनुषंगाने श्री. मनोज दशपुते (निवृत्त Lanse Naik, Indian Army) यांची प्रमुख उपस्थित होती त्यावेळी श्री. निलेशजी गुप्ता यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचे स्वागत आणि ध्वजारोहन पार पडले.

या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय खेरडे, सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थिती होते. झेंडा वंदन पार पडल्या नंतर श्री. मनोज दशपुते यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यावेळी यांच्या भाषणातुन त्यांनी आपली जीवनशैली कशी विकसीत करावी व जीवन जगण्यासाठी पुढील जीवनाचा पुर्व आराखडा कसा तयार करावा याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. भगवत गीता आपल्या संपुर्ण जीवनाचा सार आहे. तसेच ही भगवत गीता म्हणजे समुद्रात मिळणाऱ्या रत्नाचा एखादे वेळी अंत लागु शकेल पण गीतेत मिळणाऱ्या मनोमुग्धकारक भावरत्नांचा अंत लागणे कठीन आहे असे ते म्हणाले. त्यांच्या प्रभावशाली वक्तव्यातुन प्रेरीत होऊन विद्यार्थी आपल्या भविष्याचे नियोजन करण्यास प्रेरीत झाले. विद्यार्थ्यांनी देखील त्यांना उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.



